## कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा
ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र
गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल

अंक ८२ /२०२० | दिनांक १३ /१० /२०२० | कालावधी ५दिवस

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७ /१०/२०२० ते १३ /१०/२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १४ /१० /२०२० सकाळी ८:३० पासून १८ /१० /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | | १४ /१० | १५/१० | १६/१० | १७ /१० | १८ /१० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | २८ | ३९ | ३६ | ३५ | 28 |
| ३१ | ३२.४ | ३२ | | | | | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३२ | ३० | २९ | 31 |
| २४.५ | २५.५ | २६.५ | | | | | किमान तापमान (अं.से) | २६ | २६ | २६ | २६ | २६ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ८ | ७ | ८ | ८ |
| ८६ | ९२ | ८९ | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८६ | ९४ | ९१ | ९३ | ९३ |
| ७४ | ७९ | - | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५६ | ६२ | ७३ | ७३ | ७६ |
| २.६ | २.२ | १.८ | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | ४ | ७ | १० |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा | नै.द. | नै.प. | आ.पु. | आ. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३०६२.४ | ४२३३.४ |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **हवामान पूर्वानुमान/ इशारा** | | • **प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, दवारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक १४ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील पाच दिवस आद्रतेत वाढ होण्याची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.**<br>• **इशारा : दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.**<br>• **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार दिनांक १६ ते २२ ऑक्टोबर, २०२० दरम्यान कोंकण विभागासाठी पर्जन्यमान हा सरासरीपेक्षा जास्त राहील.** |
| **सामान्य सल्ला** | | • दिनांक १३ व १४ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी वादळीवारा व वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे तरी शेतात काम करताना शेतकऱ्यांनी दामिनी एप च्या सहायाने अंदाज घेवून सतर्कता बाळगावी. व अश्या स्थितीत जनावरांना ही सुरक्षित गोठ्यात बांधण्याची व्यवस्था करावी. किटक नाशक तसेच बुरशी नाशकांची फवारणी पुढे ढकलावी.<br>• दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याने परिपक्व झालेला भाजीपाला व फळांची काढणी करून घ्यावी. |
| **भात** | **दाणे भरणे ते काढणी अवस्था** | • दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याने पावसाचा अंदाज पाहून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस “वैभव” विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करावी व लगेच गोळा करून मळणी करावी.<br>• निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील |

| | | |
|---|---|---|
| | | पाणी बाहेर काढून टाकावे, शेतात पाणी साचू नये याची काळजी घेवून अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **नाचणी** | **दाणे भरणे ते काढणी अवस्था** | • दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याने पावसाचा अंदाज पाहून तयार झालेल्या नाचणी पिकाची सकाळच्या वेळेस कापणी करून लगेच मळणी करावी अथवा पुढे ढकलावी. |
| **फुलशेती** | | • दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याने तयार झालेली फुले काढून घ्यावीत व शेतात पाणी साचू नये याची काळजी घेवून अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | • दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या केळी बागेतील तण व रोगट पाने काढून टाकावीत, तसेच केळीच्या झाडांना योग्य भर देवून अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भेंडी** | **पेरणी** | • दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याने रब्बी हंगामाकरिता भेंडी लागवड पुढे ढकलावी. |
| **भाजीपाला** | **रोपवाटिका** | • दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर २०२०, दरम्यान तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याने रब्बी हंगामासाठी मिरची, वांगी व टोमॅटोची रोपे तयार करण्यात आलेल्या रोपवाटीकेत पाणी साचू नये याची काळजी घेवून अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | | • दिनांक १३ व १४ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी वादळीवारा व वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे तरी शेतकऱ्यांनी अश्या स्थितीत जनावरांना ही सुरक्षित गोठ्यात बांधण्याची व्यवस्था करावी. |
| **कुकुटपालन** | | • कोंबड्यावरील राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. पक्ष्यांच्या आणि शेडच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.** | | |